# अभियांत्रिकी कॉलेजमध्ये 'डब्ल्यूआयटी' देशात श्रेष्ठ

## 'एआयसीटीई-सीआयआय'च्या २०१३ पाहणीचा अहवाल

सोलापूर, ता. २४ : जागतिक शिक्षणाच्या मूल्यमापनाची बरोबरी करणाऱ्या देशातील मोजक्या इन्स्टिट्यूटमध्ये सोलापूरच्या वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (WIT) ला मानांकन प्राप्त झाले आहे. 'एआयसीटीई-सीआयआय'च्या पाहणी २०१३ मध्ये सिव्हिल इंजिनिअरिंग विभागास प्रथम क्रमांक मिळाला आहे.

देशभरातील तंत्रशिक्षण महाविद्यालयातून दिले जाणारे शिक्षण उद्योजकांना किती प्रमाणात पोषक आहे, याचे मूल्यमापन करण्यासाठी नवी दिल्ली येथील 'ऑल इंडिया

पान २ वर »

डब्ल्यूआयटीने देशात आपले नाव उंचावल्याने सोलापूरच्या नावलौकिकात भर पडला आहे, याचे समाधान वाटते.

– **डॉ. रणजित गांधी**, मानद सचिव, ऐलक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा

एआयसीटीई-सीआयआयने दिलेल्या मानांकनामुळे डब्ल्यूआयटीतील अभियांत्रिकीचे शिक्षण हे राष्ट्रीय पातळीवरचे असल्याचे सिद्ध झाले आहे.

– **डॉ. शशिकांत हलकुडे**, प्राचार्य, डब्ल्यूआयटी

Sakal News Paper
Dt. 25/12/2013

» पान १ वरून

कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन' (AICTE) आणि 'कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज (CII)' यांच्यातर्फे ऑक्टोबर २०१३ मध्ये पाहणी करण्यात आली. भारतातील एक हजार ५० इन्स्टिट्यूटनी त्यात सहभाग नोंदविला. त्यात 'डब्ल्यूआयटी' सर्वश्रेष्ठ ठरले असून शासकीय अभियांत्रिकी या विभागाने 'बेस्ट इंडस्ट्रीज - लिंक्ड इन्स्टिट्यूट' हे देशातील प्रतिष्ठेचे मानले जाणाऱ्या पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आहे. ही बाब केवळ सोलापूरसाठी नव्हे, तर महाराष्ट्राला अभिमान ठरणारी आहे.

अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला सर्वांगाने परिपूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देऊन त्यांच्या कौशल्यांना प्रोत्साहन देत त्यांच्या बुद्धीचा उपयोग उद्योगांनी नेमकेपणाने करून घेतला पाहिजे, अशा साधक गोष्टींचा विचार करून 'एआयसीटीई' आणि 'सीआयआय' या दोन्ही संस्थांनी एकत्रित येऊन राबविलेला एक आदर्श उपक्रम आहे. उद्योग आणि शिक्षण या दोन्हींमधील परस्परसंबंध अधिक दृढ करणे हे या पाहणीचा महत्त्वाचा उद्देश आहे. देशभरातील केवळ ३० टक्के अभियांत्रिकी महाविद्यालयांनी प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या या पाहणीला सामोरे जाण्याचे धारिष्ट दाखविले आहे.

अभियांत्रिकी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना व शिक्षक वर्गाला औद्योगिक घटकांचे प्रात्यक्षिक ज्ञान देणारे विविध उपक्रम, महाविद्यालयीन सुटीच्या काळात औद्योगिक प्रशिक्षणार्थ राबविलेले कार्यक्रम, प्राध्यापकांचा शैक्षणिक दर्जा व त्यांचे उद्योजकांसाठी केलेले मार्गदर्शन, महाविद्यालयातील साधनसुविधा, पायाभूत घटक, महाविद्यालयांकडून दिल्या जाणाऱ्या योगदानांची माहिती, उद्योजकांसाठी चर्चासत्र-परिसंवादांसारख्या कार्यक्रमांचे नियोजन, उद्योगातील आव्हाने समजून घेऊन त्याबाबत सातत्याने सुधारणा सुचविण्यासाठी औद्योगिक जगताशी कायम संलग्नित राहणे, अशा माहितीचे संकलन 'एआयसीटीई'ने केले. या सगळ्या निकषात 'डब्ल्यूआयटी' भारतात सर्वश्रेष्ठ ठरले आहे. याठिकाणी शिकविल्या जाणाऱ्या सर्वच विभागांना 'एआयसीटीई-सीआयआय'ची प्राधान्यक्रमाची मानांकने मिळाली आहेत. तर सिव्हील इंजिनिअरिंगमध्ये देशात प्रथम क्रमांक मिळाला आहे. यापूर्वी दोनवेळा 'डब्ल्यूआयटी'ने 'नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रीडेशन' (NBA) मिळवून शंभर टक्के प्लेसमेंटची संकल्पना सत्यात उतरवली आहे. यासाठी संस्थेचे अध्यक्ष अरविंद जोशी, मानद सचिव डॉ. रणजित गांधी, प्राचार्य डॉ. शशिकांत हलकुडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापक वर्गाचे परिश्रम मोलाचे ठरले आहेत.